# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

विभागीय कार्यालय, पुणे विभाग,

५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -४११०३७

दूरध्वनी - ०२० २४२०६८८०/८८१

Email:- pune.ro@mswc.in

**Website: mswarehousing.com**


निविदा ( Tender Notice)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गुलटेकडी-अ व गुलटेकडी-ब वखार केंद्राच्या आवारातील प्रत्येकी २० x २० फुट प्रमाणे प्रत्येकी ४०० चौ फुट क्षेत्रफळाचे दोन होर्डिंग (एकूण ८०० चौ फुट) प्रती माह भाडे तत्त्वावर तसेच भाडे दरात प्रती वर्षी किमान ६% दरवाढीने पाच वर्ष कालावधी करिता (२+३)देण्याचे नियोजन आहे. (lock-in-period-२ वर्ष) त्यासाठी इच्छुक जाहीरात एजन्सी कडून बंद लिफाफ्या द्वारे स्पर्धात्मक दरपत्रके दि. १९/०८/२०२५ मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| जाहीरात कालावधी | दि.०६/०८/२०२५ ते दि.१९/०८/२०२५ |
| अर्ज सादर करावयाचा शेवटचा दिनांक | दि.१९/०८/२०२५ रोजी दुपारी ४ वाजता |
| अर्ज उघडण्याचा दिनांक | दि.२०/०८/२०२५ रोजी दुपारी ४ वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर केलेल्या तारखेला |
| अर्जासोबत सादर करावयाची फी | रु. १,०००/- + (१८% GST) (through online only) |
| बयाणा रक्कम | रु. ५,००० (through online only) |
| सुरक्षा तारण ठेव रक्कम | सहा महिन्याच्या भाडे रकमे एवढी. |
| संपर्क | विभागीय कार्यालय पुणे विभाग<br>फो.नं:- ०२०-२४२०६८८०/८८१ |

जाहिरात होर्डिंग भाडे तत्वावर देण्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.

- वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता ,निविदा ,स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अटी व शर्ती :

1. अर्जदार जाहिरात एजन्सीला होर्डीग वरील जाहिरात प्रसिद्धिचा किमान पाच वर्षे कालावधीचा अनुभव असावा.(अनुभव प्रमाणपत्र/करारनामा झेरॉक्स प्रत)
2. अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -आधार,PAN ,जाहिरात होर्डिंग लायसन्स,पुणे महानगरपालिका शुल्क भरणा पावती ,मनपाशुल्क पावती ,महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम दाखला /नोंदणी प्रमाणपत्र
3. अर्जदार जाहिरात एजन्सीला प्रतिवर्षी पुणेमहानगरपालिका व कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांचेकडून परवाना घेणे व परवाना शुल्क भरणे बंधनकारक राहील.
4. विविध कंपन्या, व्यक्ती, संस्था, इत्यादींच्या जाहीराती छपाई, प्रसिद्धी, त्यासाठी लागणारी सामुग्री, वीज देयके इत्यादी व तत्सम बाबींचा तसेच त्या अनुषंगाने व्यवसायीक बाबींचा महामंडळाचा संबंध राहणार नाही.
5. इच्छुक जाहिरात एजन्सीने या निविदेद्वारे दरमहा प्रति चौ. फूट प्रति महिना (जीएसटी शिवाय) दर सादर करावा.
6. तसेच सदरची निविदेद्वारे यशस्वी निविदाकाराचा कालावधी हा पुढील पाच वर्षे एवढा राहणार आहे .(त्यामध्ये दोन वर्ष lock-in-period असेल) प्रतिवर्षी दरवाढ किती टक्के राहील याबाबत निविदाकाराने अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.
7. महामंडळाने उभारलेल्या होर्डीच्या स्ट्रक्चरमध्ये कोणताही बदल करण्याची अनुमती संबंधीत निविदाकारास राहणार नाही. असा बदल परस्पर केल्यास व त्यामुळे कोणताही अपघात घडल्यास किंवा महामंडळाचे आर्थिक वा लौकीक नुकसान झाल्यास अथवा त्यामुळे कायदेशीर बाबी उद्भवल्यास त्या बाबत संबंधित निविदाकार संपूर्णतः जबाबदार राहील.
8. महामंडळाने निश्चित केलेल्या विहित करारनाम्यामध्ये यशस्वी निविदाकारास करारनामा करणे बंधनकारक राहील. त्या करिता येणार सर्व खर्च यशस्वी निविदाकारास करावा लागेल.
9. होर्डीगच्या भाड्याची रक्कम दरमहा १० तारखेपर्यंत महामंडळाच्या वखार केंद्रावर जमा करावी लागेल. दिरंगाई झाल्यास १८% प्रति वर्ष दराने दंड आकारणी करण्यात येईल.
10. करारनाम्याचा वैधता कालावधी महामंडळाचे आदेश पारीत केल्यानंतर पाच वर्षे(२+३) असा राहील. एजन्सीला मुदतवाढ देणे किंवा नव्याने एजन्सींची नियुक्ती करणेसाठीचे सर्व अधिकार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचेकडे राहतील.
11. महामंडळाचे होर्डीग भाड्याने मिळण्यासाठी सोबतच्या नमुन्यामध्ये माहिती भरून तो अर्ज बंद लिफाफ्यामध्ये विभागीय कार्यालय, पुणे विभाग, यांच्या नावे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे विभाग, ५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११०३७ या पत्यावर दिनांक.१९/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मिळेल अशा बेताने पाठवावा.
12. अर्जदार जाहिरात एजन्सीने इ-निविदेद्वारे सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर एजन्सीचे महामंडळाकडे जमा केलेली बयाणा रक्कम, सुरक्षा तारण ठेव रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच सदर एजन्सीला पुढील ३ वर्षे कालावधीसाठी महामंडळाकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.
13. अपूर्ण माहिती भरलेला, अथवा आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्यास सदरचा अर्ज रद्द करण्यात येईल. अशा प्रकरणी बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.
14. सहा महिन्याच्या भाडे रकमे एवढी विना व्याज सुरक्षा तारण ठेव रक्कम जमा करावी लागेल.

-सही/-

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**अर्जाचा नमुना :**

## Empanelment होणेसाठीचा विनंती अर्ज

1. अर्जदार एजन्सीचे नाव :
2. कार्यालयाचा पत्ता :
3. जीएसटी क्रमांक :
4. पॅन क्रमांक :
5. ई-मेल:
6. फोन नंबर :
7. संपर्कासाठीच्या व्यक्तीचे नाव व मोबाईल नंबर:
8. होर्डींग साठीचे भाडे दर प्रति महिना प्रति चौरस फूट :
9. होर्डींगसाठीचे दरवाढ प्रति वर्षी टक्के :
10. इतर माहिती :

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :

1. मुंबई प्रांतिक दुकाने व आस्थापना परवानाची छायांकीत प्रत
2. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
3. पॅन नोंदणी प्रमाणपत्र
4. अर्जदार जाहिरात एजन्सीला होर्डींग जाहिरातीचा अनुभव असल्याबाबतचा पुरावा (महानगरपालिकेकडील पाच वर्षे कालावधीतील परवाना शुल्क भरल्याची पावती आवश्यक)
5. जाहीरात एजन्सीला कोणत्याही शासकीय / निमशासकीय आस्थापनेकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नाही याबाबतचे लेटरहेडवर स्वयंघोषणापत्र

*****